# अजित पवारांच्या मृत्यूचा तपास थातूरमातूर नको, अन्यथा महाराष्ट्र दाखवून देईल रोहित पवारांचा थेट इशारा

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर आता राजकीय वर्तुळात संशयाची पाल चुकचुकू लागली असून, आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणाच्या तपासावरून अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. "अजित पवार यांच्या मृत्यूची चौकशी केवळ नावापुरती नको, तर ती सखोल आणि पारदर्शक व्हायला हवी. जर यंत्रणांनी यात वेळकाढूपणा केला किंवा चुकीचा तपास केला, तर मराठी माणूस काय आहे हे त्यांना दाखवून द्यावे लागेल," अशा शब्दांत रोहित पवारांनी सरकारला आणि तपास यंत्रणांना इशारा दिला आहे.

**तपासाच्या दिशेवर प्रश्नचिन्ह**

रोहित पवार यांनी या अपघातातील अनेक तांत्रिक मुद्द्यांवर बोट ठेवले आहे. "दोन रिपोर्ट आले असले तरी सर्वात महत्त्वाचा रिपोर्ट अद्याप समोर आलेला नाही. ऐनवेळी वैमानिक बदलण्याचे कारण काय? सीआयडी (CID) आतापर्यंत काय करत होती? सीबीआयकडे तपास गेला असला तरी त्यांना दोन-तीन महिने लागतात, मात्र या काळात तपासाची दिशा भरकटू नये," अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. अमोल मिटकरी आणि रूपाली ठोंबरे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन आपण स्वतः या मागणीचा पाठपुरावा करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**राजकीय पुनर्गठनाचे संकेत**

केवळ तपासच नव्हे, तर आगामी राजकीय गणितांवरही रोहित पवारांनी भाष्य केले आहे. "आमचे नेते या अधिवेशनासह पुढील सर्व कार्यक्रमात 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' पक्ष आणि महाविकास आघाडी म्हणून एकसंध राहतील," असे सांगून त्यांनी युतीची वज्रमूठ कायम असल्याचे दाखवून दिले.

**शरद पवारांच्या राज्यसभा उमेदवारीवर मोठे विधान**

राज्यसभेच्या रिक्त जागेबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले की, "खुद्द अजित पवार यांचीही इच्छा होती की शरद पवारांनी राज्यसभेत जावे. जर शरद पवार स्वतः इच्छुक असतील, तर महाविकास आघाडीचा त्यांना पूर्ण पाठिंबा असेल. अद्याप आघाडीची अधिकृत बैठक झाली नसली तरी, इतर पक्षांची आता काय मानसिकता आहे, हे लवकरच स्पष्ट होईल."

अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेली ही पोकळी आणि तपासातील संशयास्पद बाबींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मोठी खळबळ उडालेली असून, रोहित पवारांच्या या भूमिकेमुळे तपास यंत्रणांवर आता मोठा दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे.

# राज्याला ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचा निर्धार

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२६ मधील पहिल्या अधिवेशनाची सुरुवात राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने दिमाखात झाली. आपल्या भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शांचा उल्लेख करत राज्याला ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचा निर्धार व्यक्त केला.

राज्याच्या प्रगतीचा आढावा घेताना राज्यपाल म्हणाले की, २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित केली आहे. हे प्रमाण देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३९ टक्के असून, महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी देशात प्रथम क्रमांकावर आहे. तसेच दावोस येथील परिषदेत झालेल्या ३० लाख कोटी रुपयांच्या करारांमधून सुमारे ४० लाख नवीन रोजगारनिर्मिती होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी कल्याणासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत राज्यपालांनी 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना'चा उल्लेख केला. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज दिली जात आहे. तसेच सौर पंप बसविण्याच्या मोहिमेत महाराष्ट्राने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये स्थान मिळवले असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले.

मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा मिळाल्यानंतर शासनाने उचललेल्या पावलांचेही त्यांनी कौतुक केले. तंत्रशिक्षणातील १५४ विषयांची पुस्तके आता मराठीत उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ४२ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी मातृभाषेतून शिक्षण घेत असल्याचे सांगून त्यांनी ही राज्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले.

- समृद्धी महामार्ग : या महामार्गाचा विस्तार पालघर आणि पूर्व विदर्भापर्यंत करण्यात येणार.
- महिला सक्षमीकरण : २६ लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत.
- सांस्कृतिक वारसा : महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला आहे.
- कुंभमेळा : २०२७-२८ मधील नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे.

भाषणाच्या समारोपात राज्यपालांनी "विकसित महाराष्ट्र – २०४७" हे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करण्याचे आवाहन केले.

# १९८५ पासून अनेक दिग्गज पाहिले, पण दादांसाठी शोकप्रस्ताव मांडावा लागेल असे स्वप्नातही वाटले नव्हते - छगन भुजबळ

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

"अजितदादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक असा आधारवड होता, जो आज अकाली उन्मळून पडला आहे. त्यांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती केवळ राजकारणातील नसून ती सामाजिक आणि वैयक्तिक हानी आहे," अशा भावूक शब्दांत राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. अजित पवार यांच्या निधनानंतर विधानसभेत मांडण्यात आलेल्या शोकप्रस्तावावर बोलताना भुजबळ यांना जुन्या आठवणींनी ग्रासले होते.

**विश्वासापलीकडचे सत्य**

छगन भुजबळ यांनी आपल्या भाषणात १९८५ पासूनच्या संसदीय कारकीर्दीचा संदर्भ दिला. ते म्हणाले, "मी आजवर अनेक दिग्गजांना निरोप दिला आहे, अनेक शोकप्रस्ताव पाहिले. मात्र, आपल्या सर्वांचे लाडके 'दादा' इतक्या लवकर आपल्याला सोडून जातील आणि त्यांच्यासाठी मला शोकप्रस्ताव मांडावा लागेल, असे कधी स्वप्नातही वाटले नव्हते. आजही ते आपल्यातच कोठेतरी वावरत आहेत, असा भास होतो. या कटू सत्यावर मन विश्वास ठेवायला तयार नाही."

**विरोधकांच्या कामांनाही दिला सन्मान**

अजितदादांच्या कार्यपद्धतीचा गौरव करताना भुजबळ यांनी त्यांच्या प्रशासकीय कौशल्याची आणि सर्वसमावेशक वृत्तीची आठवण करून दिली. "शरद पवार साहेबांच्या तालमीत तयार झालेल्या दादांनी राजकारणात स्वतःचा एक वेगळा आणि करारी ठसा उमटवला होता. त्यांच्या कामात कमालीची तत्परता आणि वक्तशीरपणा होता. विशेष म्हणजे, कामाच्या बाबतीत त्यांनी कधीही पक्षभेद केला नाही; विरोधकांची कामे देखील ते तितक्याच प्राधान्याने मार्गी लावत असत," असे भुजबळ यांनी आवर्जून नमूद केले.

**न भरून निघणारी हानी**

अजितदादांच्या कामाची शिस्त आणि सामान्यांच्या प्रश्नांची जाण हा आम्हा सर्व लोकप्रतिनिधींसाठी एक वस्तुपाठ होता, असे सांगत भुजबळांनी त्यांच्या निधनाने महाराष्ट्र पोरका झाल्याची भावना व्यक्त केली. विधानसभेत आज या शोकप्रस्तावावेळी सर्वच पक्षांच्या नेत्यांनी आणि सदस्यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला, मात्र भुजबळांच्या भाषणाने संपूर्ण सभागृहाचे वातावरण हेलावून गेले.

# रो-रो फेरीचे तिकीट दर कमी करा कोकणवासियांची मागणी

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

१ मार्चपासून मुंबई ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग दरम्यान रो-पॅक्स प्रवासी फेरी सेवा सुरू करण्याची घोषणा राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी केली आहे. मात्र आता ही सेवा तिकीट दरांमुळे वादात सापडली असून, बोटीचे तिकीट दर कमी करण्याची मागणी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांनी केली आहे. रो-रो सेवेच्या तुलनेत बस आणि रेल्वे तिकीट अधिक परवडणारे आहे. त्यामुळे शासनाने कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू करण्यात येणाऱ्या बोटीचे तिकीट दर त्यांना परवडतील असेच ठेवण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे. या सेवेचे उद्घाटन १ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजता मुंबईतील फेरी व्हार्फ येथून होणार आहे. आम्ही दरवर्षी गणपती, यात्रा आणि शिमग्यासाठी कारने गावाला जातो. बोटीमुळे वाहतूक कोंडीतून सुटका होणार असली तरी, त्याचे गाडीसह प्रवासी तिकिटदर पाहता रस्ते मागनिच जाणे परवडणारे आहे. बोटीपेक्षा पेट्रोल खर्च कमी आहे, अशी प्रतिक्रिया प्रवासी कल्पेश सुर्वे यांनी दिली.

# आता 'दिव्यांग' होणार खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**



राज्यातील दिव्यांग बांधवांच्या स्वप्नांना आता अधिकृत पाठबळ मिळणार असून, त्यांच्या आर्थिक प्रगतीचा मार्ग सुकर होणार आहे. दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी मंत्रालयात पार पडलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत दिव्यांगांसाठीच्या कर्ज योजनांची अत्यंत प्रभावी आणि गतिमान अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. या बैठकीत केवळ कर्ज प्रक्रियेवरच नाही, तर महामंडळाच्या अस्मितेवरही मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

दिव्यांग वित्त विकास महामंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना मंत्री अतुल सावे यांनी प्रशासनाला खडसावून सांगितले की, "पात्र लाभार्थ्यांपर्यंत कर्जाची रक्कम वेळेत पोहोचलीच पाहिजे. प्रक्रियेत असलेली गुंतागुंत कमी करून ती अधिक सुलभ करा आणि जिल्हास्तरावर योग्य समन्वय ठेवा." दिव्यांगांना स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांना व्यवसायासाठी लागणारे भांडवल सहज उपलब्ध व्हावे, हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीतील सर्वात महत्त्वाचा आणि सन्मानजनक निर्णय म्हणजे महामंडळाचे नामकरण. आतापर्यंत 'अपंग महामंडळ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थेचे नाव बदलून आता 'महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ' असे करण्यास अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे दिव्यांग बांधवांना अधिक सन्मानाची वागणूक मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

या बैठकीस दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्यासह आयुक्त सत्यजित बडे आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रलंबित प्रस्तावांचा आढावा घेत असतानाच, आगामी काळात जास्तीत जास्त दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष कार्ययोजना आखण्यावर भर देण्यात आला. केवळ कागदोपत्री योजना न ठेवता, त्या प्रत्यक्ष जमिनीवर राबवून दिव्यांगांना आर्थिक सक्षम करण्याचा निर्धार मंत्री सावे यांनी व्यक्त केला आहे.

# राज्यातील ६ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांवर नवी जबाबदारी

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

राज्य सरकारने प्रशासकीय फेरबदल अंतर्गत ६ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांना विविध जिल्ह्यांचे पालक सचिव म्हणून नव्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत. यामध्ये राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल यांची गडचिरोली जिल्ह्याचे पालक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तर दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची परभणी जिल्ह्याचे पालक सचिव म्हणून नेमणूक झाली आहे. पालक सचिवांची भूमिका महत्त्वाची असते. प्रत्येक जिल्ह्यासाठी नेमलेले पालक सचिव शासकीय धोरणे, कल्याणकारी योजना आणि प्रशासकीय सुधारणांची प्रभावी अंमलबजावणी करतात.

ते प्रलंबित बाबी तातडीने सोडवतात, जिल्ह्यात वर्षातून किमान ४ वेळा (३ महिन्यांनी एकदा) दौरा करतात, योजनांचा आढावा घेतात, अडचणी ओळखून उपाय सुचवतात आणि अहवाल सादर करतात. यापूर्वी एकनाथ शिंदे सरकारने राज्यातील ३६ जिल्ह्यांसाठी पालक सचिव नेमले होते. आता प्रशासकीय कारणांमुळे काही बदल करण्यात आले आहेत.

**नव्या पालक सचिवांच्या नियुक्त्या**

**गडचिरोली** : मुख्य सचिव राजेश अगरवाल (पूर्वी मिलिंद म्हैसकर, अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग)

**वर्धा** : मिलिंद म्हैसकर (पूर्वी अनुपकुमार यादव, सचिव, महिला व बालविकास विभाग)

**मुंबई शहर** : मनिषा वर्मा, अ.मु.स., कौशल्य, रोजगार, नाविन्यता व उद्योजगता विभाग (पूर्वी इकबाल सिंह चहल, जे ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत)

**परभणी** : तुकाराम मुंढे, सचिव, दिव्यांग कल्याण विभाग (पूर्वी दिपक कपूर, अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग)

**वाशिम** : किरण कुलकर्णी, सचिव, मराठी भाषा विभाग (पूर्वी गणेश पाटील, सचिव, मृद व जलसंधारण विभाग)

**रत्नागिरी** : आप्पासो धुळाज, सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग (पूर्वी सीमा व्यास, अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग व विशेष चौकशी अधिकारी-१)

तुकाराम मुंढे हे २००५ बॅचचे आयएएस अधिकारी असून, त्यांनी यापूर्वी सोलापूर जिल्हाधिकारी, नाशिक व नागपूर महापालिकांच्या आयुक्तपदी काम केले आहे. त्यांची शिस्तबद्ध प्रशासकीय शैली नेहमीच चर्चेत राहिली आहे. हा फेरबदल राज्यातील शासकीय योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासकीय गती वाढवण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**
**Email: centralmumbai.ee@mahapwd.gov.in**
**फोन - ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स**

**जा.क्र.का.अ./ममुंबि/ई-निविदा / ७५१** **दिनांक :-२०/०२/२०२६**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता १० लक्ष च्या आतील कामांची निविदा सुचना क्र.३६ (छस्तीस) (सन २०२५-२६) नुसार एकुण-१४ कामांचा निविदा विक्री कालावधी दि. २४/०२/२०२६, दुपारी १५.०० पासून ते दि.०२/०३/२०२६ रोजी १५.०० पर्यंत असून "बी-१" नमुन्यातील निविदा मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,**
**वरळी, मुंबई.**

**डीजीआयपीआर/आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी६१०६**

# शेतीचा चेहरामोहरा बदलणार 'डिजिटल क्रांती'

## कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर बळीराजा होणार हायटेक!




**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

"डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा हे केवळ तंत्रज्ञान नसून ते शेतकऱ्यांचे जीवन बदलणारे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे," असे प्रतिपादन जागतिक स्तरावरील तज्ज्ञांनी मुंबईत केले. महाराष्ट्र सरकारच्या कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत आयोजित 'एआय फॉर ॲग्री २०२६' परिषदेत तंत्रज्ञान आणि शेतीची सांगड घालणारा एक नवा मार्ग अधोरेखित करण्यात आला.

डेटाच्या बळावर पारदर्शक शेती पीक पद्धती, हवामानाचा अंदाज आणि बाजारभाव यांसारख्या विखुरलेल्या माहितीचे (डेटा) एकत्रीकरण करून त्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) संस्कार केल्यास कृषी क्षेत्रात अभूतपूर्व कार्यक्षमता येईल, असा विश्वास या परिसंवादात व्यक्त झाला. तंत्रज्ञानापेक्षाही त्यातून मिळणारे 'ज्ञान' समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत कसे पोहोचते, हे अधिक महत्त्वाचे असल्याचे मत मान्यवरांनी मांडले.

**भारताच्या 'डीपीआय' मॉडेलची जगाला भुरळ**

नैसर्गिक संसाधन तज्ज्ञ मोनिका पेट्री यांनी भारताच्या पुढाकाराचे कौतुक करताना सांगितले की, "भारताने कृषी क्षेत्रात राबवलेले डीपीआय मॉडेल पाहून आज जग प्रेरित होत आहे." विशेषतः 'युनिफाइड एपीआय सँडबॉक्स' सारख्या संकल्पनांमुळे स्टार्टअप्सना नवकल्पना मांडण्यासाठी मोठे व्यासपीठ मिळाले आहे. ही व्यवस्था शासन, समाज आणि तंत्रज्ञान यांना जोडणारा एक भक्कम दुवा ठरत आहे.

**पुढील पाच वर्षे कृषी डिजिटायझेशनसाठी महत्त्वाची**

एक्स्टेप फाउंडेशनचे शंकर मारुवाडा यांनी नमूद केले की, नोंदणी प्रणाली आणि परस्पर सहकार्य या जोरावर पुढील पाच वर्षांत कृषी क्षेत्रात डिजिटल पायाभूत सुविधांची परिपक्वता साध्य होईल. जागतिक दक्षिण देशांमधील समन्वय या प्रक्रियेला अधिक वेग देईल.

या जागतिक परिषदेत केंद्रीय कृषी मंत्रालयाचे राजीव चावला, काझुहिरो कोबायाशी आणि आर्थर रेइस रिमोल्डी यांसारख्या दिग्गजांनी सहभाग घेतला. या चर्चेतून समोर आलेले उपाय आगामी काळात महाराष्ट्रातील कृषी धोरणांना एक नवी आणि आधुनिक दिशा देणारे ठरणार आहेत.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीस्थानाचा विधानसभाध्यक्षांचा प्रस्ताव

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन राज्यासाठी आणि देशासाठी देखील मोठे नुकसान झाले आहे. या शब्दात विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सहवेदना व्यक्त केल्या. अजित पवार यांच्याबद्दल सभागृहातील सदस्यांच्या भावना विचारात घेता विधिमंडळ परिसरात अजित पवार यांचे स्मृतीस्थान असावे, असा मानस इच्छा व्यक्त करुन शासनासमोर याबाबतचा प्रस्ताव मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री सुरुपसिंग नाईक, माजी मंत्री डॉ.शालिनीताई पाटील, माजी राज्यमंत्री राज पुरोहित, माजी सदस्य गंगाधर पटने, नीळकंठ फालक, विश्वास नांदेकर रुपलेखा ढोरे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत शोकप्रस्ताव मांडला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या व्यक्तिमत्त्वातील शिस्त, वेळेचे काटेकोर पालन, कामातील परिपूर्णतेची जाणीव आणि सहकाऱ्यांप्रती असलेली आपुलकी यांचा उल्लेख करताना विधानसभा अध्यक्ष ॲड.नार्वेकर यांनी त्यांच्याबद्दलच्या आठवणी जाग्या केल्या. जीएसटी कौन्सिलमध्ये महाराष्ट्राची बाजू ठामपणे मांडणारा सक्षम अर्थमंत्री म्हणूनही त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. पहाटेपासून कामाला लागून कामकाजाची वेगळी पद्धत दाखवणारा नेता, दिलेला शब्द पाळणारा राजकारणी अशी त्यांची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी विधिमंडळाच्या आवारात त्यांच्या नावाने स्मृतीस्थान उभारण्याचा मानस असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. पुढील पिढ्यांना त्यांच्या कार्याची जाणीव राहावी, असे त्यांनी नमूद केले.

माजी मंत्री सुरूपसिंग नाईक यांनी आदिवासी समाजासाठी शिक्षण, सहकार आणि व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा विधानसभा अध्यक्षांनी गौरव केला. डॉ. शालिनीताई पाटील यांनी सहकार, शिक्षण आणि ग्रामीण आरोग्य क्षेत्रात उभारलेल्या संस्थांची माहिती त्यांनी दिली. माजी राज्यमंत्री राज पुरोहित यांच्या लढाऊ नेतृत्वाची आणि भाडेकरू-व्यापारी वर्गासाठी त्यांनी संघर्ष केल्याचे त्यांनी सांगितले. गंगाधर पटने, नीलकंठ चिंतामण फालक, विश्वास रामचंद्र नांदेकर आणि रुपलेखा ढोरे यांनी शिक्षण, सहकार, सामाजिक चळवळी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील केलेल्या योगदानाचा त्यांनी यावेळी उल्लेख केला.

यावेळी मंत्री छगन भुजबळ, ॲड.आशिष शेलार, हसन मुश्रीफ, गुलाबराव पाटील, अदिती तटकरे यांच्यासह सभागृहातील सदस्य भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, दिलीप वळसे पाटील, सुधीर मुनगंटीवार, सुनील प्रभू, नितीन राऊत, रोहित पवार, विश्वजित कदम, जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर सभागृहातील सर्व सदस्यांनी शोकप्रस्तावास संमती देऊन दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

**जाहिर नोटीस**

माझे अशिल सौ. निशा प्रदीपकुमार श्रीवास्तव (लग्नापुर्वीचे नाव : निशा देवव्रतलाल श्रीवास्तव), वय ४४ वर्षे, सज्ञान, भारतीय, राहणार अकबर शेठ चाळ, रुम नं. १, १५०/बी, वारस लेन, ओल्ड म्युनिसिपल स्कुल जवळ, वरळी कोळीवाडा, मुंबई ४०००३०, यांच्या सांगण्यावरुन जाहिर नोटीस देत आहे.

माझ्या अशिलांचे वडील कै. श्री. देवब्रतलाल राजबहादुर श्रीवास्तव यांच्या नावावर व कब्जे वहिवाटीमध्ये असलेली मिल कामगारांना शासनातर्फे देण्यात आलेली रुम/खोली तिचा पत्ता : सेंच्युरी मिल म्हाडा संकुल, २-सी, रुम नं. ९०४, ९ वा मजला, डॉ. एनी बेझंट रोड, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ ही आहे. माजी मिल, कामगार (माझ्या अशिलांचे वडील) श्री. देवब्रतलाल राजबहादुर श्रीवास्तव हे सेंच्युरी मिल, वरळी येथे (ईडीपी नं. ०४९३४) विविंग खात्यातून सन २००६ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती व त्यानंतर त्यांचे दिनांक २३/०७/२०२५ रोजी निधन झाले आहे. तसेच माझ्या अशिलांची आई श्रीमती. मनोरमा देवब्रतलाल श्रीवास्तव यांचे दिनांक १८/१०/२०२५ रोजी निधन झाले आहे. माझ्या अशिलांच्या आई वडीलांच्या निधनापश्चात खालीलप्रमाणे वारस आहोत.

| अनु. क्र. | नाव | वय | श्री. देवब्रतलाल राजबहादुर श्रीवास्तव यांच्याशी नाते |
|---|---|---|---|
| १. | सौ. निशा प्रदीपकुमार श्रीवास्तव (लग्न. नाव निशा देवव्रतलाल श्रीवास्तव) | ४४ वर्षे | विवाहित मुलगी |
| २. | श्री. प्रमोद देवब्रतलाल श्रीवास्तव | ५१ वर्षे | मुलगा |
| ३. | सौ. सुषमा संतोष श्रीवास्तव (लग्न. नाव सुषमा देवब्रतलाल श्रीवास्तव) | ४५ वर्षे | विवाहित मुलगी |
| ४. | अंजू देवब्रतलाल श्रीवास्तव | ३७वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत.

माझ्या अशिलांचे म्हणणे आहे की, मयत श्री. देवब्रतलाल राजबहादुर श्रीवास्तव यांच्या पश्चात माझे अशिल ह्या कायदेशीर वारस विवाहित मुलगी असून अशिलाचे वडील यांच्या निधनापश्चात माझ्या अशिलाच्या नावे म्हाडा सदनिका हस्तांतर करण्याकरिता वारस प्रमाणपत्रासाठी जाहिर नोटीस देत आहेत. यासाठी कोणतीही ना हरकत आक्षेप असल्यास जिल्हा अधिकारी कार्यालय मुंबई शहर यांचे कार्यालय ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई येथे ०७दिवसात आपली तक्रार नोंद करावी अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहित धरण्यात येईल.

**सही/-**
**एस.बी. शिंदे (बी.ए.एल.एल.बी)**
**वकिल, उच्च न्यायालय**
**२/१९ म्युनिसिपल कॅम्प, परळ, भोईवाडा, मुंबई-४०००१२.**

# गुंतवणुकीसाठी इव्हॉल्व कंपनीचा राज्य शासनाशी करार



**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियाची इव्हॉल्व कंपनी राज्यात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे. नवी मुंबई, पुणे, आणि नागपूर परिसरात कंपनी जवळपास 300 कोटी रुपयांची गुंतवणूक करीत आहे. या गुंतवणुकीतून जवळपास १ हजार ७५ लोकांना रोजगार मिळणार आहे. त्यासाठी कंपनीने राज्य शासनसोबत करार केल्याची माहिती उद्योग विभागामार्फत देण्यात आली. या करारांचे आदान प्रदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विधान भवन येथे उद्योग विभाग व कंपनीमध्ये करण्यात आले.

यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कंपनीच्या गुंतवणुकीबाबत माहिती दिली. यावेळी उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बळगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, इव्हॉल्व कंपनीचे कंट्री हेड आदित्य शर्मा, इव्हॉल्व कंपनीच्या भारतीय सहभागीदार असलेल्या एम्प्रेसेंड उद्योग समूहाचे अध्यक्ष रुस्तम केरावाला, वरूण गुप्ता, उद्योग विभागाचे सहसचिव श्रीकांत पुलकुंडवार आदी उपस्थित होते.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**बृहन्मुंबई महानगरपालिका लो.टि.म.स. रुग्णालय, शीव, मुंबई - 400022**
**क्रं. एलटिएच/एसडी/720/ एम. दि. 18/02/2026**

**ई - निविदा सुचना**

ही ई-निविदा सुचना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे (बृ.मुं. मनपा) आयुक्त खालील दर्शविल्यानुसार तीन पॅकेट प्रणालीतून ई- निविदा मागवित आहेत.

कामाचे वर्णन : लो.टि.म.स. रुग्णालयासाठी हायवायरल ट्रासपोर्ट स्वॅाब & कलचर मिडीयम फॉर एच1एन1 इनफ्लुएंजा वायरस आयसोलेशन.

| अनु. क्र. | विवरण | ई निविदा शुल्क (रु.) | इसारा (रु.) | ऑनलाईन बोली डाऊनलोडिंगची सुरूवातीची तारिख व वेळ | ऑनलाईन बोली सादरीकरणाची अंतिम तारिख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1. | हायवायरल ट्रासपोर्ट स्वॅाब & कलचर मिडीयम फॉर एच1एन1 आयसोलेशन 100 किंट (1 किट = इनफ्लुएंजा वायरस 50nos) बोली क्रं. 2026_MCGM_1279840 | रु. 1452 + जीएसटी 18% प्रमाणे | रु. 16800 | 18/02/2026 06.00 pm (18:00 Hrs) | 28/02/2026 04.00 pm (16:00 Hrs) |

इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या पुढील तपशिलाकरिता महाटेंडर पोर्टल या वेबसाईट https://mahatenders.gov.in/ ला भेट द्यावी.

निविदा दस्तावेज टपालाव्दारे वितरीत वा स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

**सही/-**
**अधिष्ठाता**
**लो.टि.म.स. रुग्णालय, शीव**

झाडे लावा, झाडे जगवा

पीआरओ/३०६०/जाही/२०२५-२६

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 8433508283 | Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00013906** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) श्री राजेश कुमार रवींद्र चक्रवर्ती (कर्जदार) ११०१, ११ वा मजला, अरुंधती सीएचएस, प्लॉट क्र. ३५, स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई: ४०००७१. | |
| सह–कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती ज्योती गुलाटी चक्रवर्ती (सह–कर्जदार) ११०१, ११ वा मजला, अरुंधती सीएचएस, प्लॉट क्र. ३५, स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई: ४०००७१. | |
| मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट नं. ११०१, ११ वा मजला, अरुंधती हाइट्स, प्लॉट नं. ३५, स्वस्तिक पार्क, मंगल आनंद हॉस्पिटलजवळ, दीपक कुंदर मार्ग, व्हिलेज चेंबूर चे सीटीएस क्रमांक ३६६/२१, चेंबूर (ई), मुंबई ४०००७१, मुंबई, महाराष्ट्र, भारत. | |
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | ३,१५,६१,१११/– (रुपये तीन कोटी पंधरा लाख एकसष्ट हजार एकशे अकरा फक्त) |
| लिलावाची तारीख | १६ मार्च २०२६ |
| राखीव किंमत | ३,८८,५०,०००/– (रुपये तीन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | २५,०००/– (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | ९ मार्च २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | १३ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १६ मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: २३ फेब्रुवारी २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता